# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६७९ दिनांक २९.०८.२०२०

## मनाई आदेशाचे उल्लंघन करुन गौरी विसर्जन मिरवणुकीत ५ किंवा ५ पेक्षा जास्त इसमांनी सहभाग घेतले प्रकरणी पालघर जिल्हयात ०२ गुन्हे दाखल

मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील आदेश क्रमांक- पालघर/कोरोना विषाणु/प्रतिबंधात्मक आदेश/कावि/३५६/२०/दि.३१/०७/२०२० अन्वये पालघर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाणे हद्दीत फौ.प्र.संहीता १९७३ चे कलम १४४ अन्वये दि ३१/०७/२०२० ते दि ३१/०८/२०२० अन्वये मनाई आदेश लागु असल्याचे माहीत असतांना सुध्दा पालघर जिल्हयात गौरी विसर्जन मिरवणुकीत ५ किंवा ५ पेक्षा जास्त इसमांनी सहभाग केलेप्रकरणी पालघर जिल्हयात खालील प्रमाणे ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १. | अर्नाळा पोलीस ठाणे | गु.र.नं. ॥ ३०४/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ५१(ब), सह साथीचे रोग प्रतिबंधक कायदा कलम २,३,४ प्रमाणे |
| २. | | गु.र.नं. ॥ ३०५/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ५१(ब), सह साथीचे रोग प्रतिबंधक कायदा कलम २,३,४ प्रमाणे |

कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता मा.जिल्हाधिकारी, पालघर यांनी पाच पेक्षा अधिक इसम एकत्र जमणार नाही, असा मनाई आदेश काढलेला असतांना देखील पाच पेक्षा अधिक इसम एकत्र जमुन गौरी विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाल्याने १३२ आरोपीत यांचेवर वरील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तरी नागरीकांना पालघर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढु नये या करिता शासनास सहकार्य करावे. अन्यथा आपणास सुध्दा अशा प्रकारच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.

Scanned with CamScanner